# प्रेस नोट

## दुर्गोत्सवाकरीता ऑनलाईन परवानगी

संपुर्ण महाराष्ट्र राज्याप्रमाणे हिंगोली जिल्ह्यात देखील दरवर्षी दुर्गोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. सदर उत्सव सार्वजनिक रित्या साजरा करण्याकरीता पोलीस विभागाची परवानगीची आवश्यकता असते. यापुर्वी सदर परवानगी ही लेखी स्वरुपाचा अर्ज देवुन त्यावरुन दुर्गा मंडळे परवागनी मिळवत असत. परंतु केंद्र शासनाच्या ई– गव्हर्नस योजने अंतर्गत क्राईम अँन्ड क्रिमीनल ट्रेकींग नेटवर्क अँन्ड सिस्टीम (CCTNS) प्रकल्प संपुर्ण देशात राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने सन 2022 चे दुर्गोत्सव साजरा करणेस परवागनी मिळण्याकरीता मंडळाने संबंधीत पोलीस स्टेशनकडे ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज सादर करावा. त्यामध्ये मंडळाचे सदस्या संबंधी माहीती, बसविण्याची जागा व विसर्जनाचा मार्ग, तारीख इत्यादी बाबतची सविस्तर माहीती नमुद करावी. त्यावर पोलीस स्टेशन कडुन पडताळणी करुन मंडळाला परवानगी देण्यात येईल. कोणीही लेखी स्वरुपात परवागनीकरीता अर्ज करु नयेत. ऑनलाईन पध्दतीने परवागनी मिळणे करीता भरावयाचा अर्जाचा नमुना https://citizen.mahapolice.gov.in या साईटचा वापर करुन स्वत: चा युजर आयडी तयार करुन अर्ज करता येवु शकतो. सदर प्रकारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास संबंधीत पोलीस स्टेशनला भेट देवुन माहीती मिळवावी असे आवाहन पोलीस अधिक्षक श्री राकेश कलासागर साहेब व अप्पर पोलीस अधिक्षक श्री यशवंत काळे साहेब यांनी केले आहे.